स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से दिखता है...!

● बीड ● सोमवार, दिनांक ०२ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ५७ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# कामाच्या ठिकाणी महिला सुरक्षित आहेत का? राज्यातील सर्व कार्यालयांचे होणार विशेष ऑडिट

'पॉश' कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर किंवा या आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई : रूपाली चाकणकर

सर्व शासकीय, निमशासकीय आणि खाजगी कार्यांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी 'पॉश' कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

पॉश कायद्याविषयी पुरेशी जनजागृती आणि प्रशिक्षण झाली नसल्याने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला : रूपालीत चाकणकर

## तीस दिवसांत अहवाल सादर करण्याचे रूपाली चाकणकर यांनी दिले कडक निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**
**राज्यभरातील सर्व शासकीय निमशासकीय आणि खाजगी कार्यांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी लागू असलेल्या 'पॉश' (posh) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे समोर आल्यानंतर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने राज्यातील सर्व शासकीय आणि खाजगी कार्यालयांच्या अंतर्गत समितीचे विशेष ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीत चाकणकर यांनी या संदर्भात सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना कडक निर्देश दिले असून तीस दिवसांच्या आत ऑडिट अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.**

### पॉश कायद्याविषयी पुरेशी जनजागृती आणि प्रशिक्षण नाही !!

● महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी आणि निरीक्षणांनुसार अनेक कार्यांमध्ये अद्याप अंतर्गत समितीची ( आयसी ) रचना झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहेत.

● ज्या ठिकाणी समित्या आहेत त्या नियमितपणे कार्यरत नाहीत वार्षिक अहवाल वेळेवर सादर केले जात नाहीत तसेच समितीने दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. पॉश कायद्याविषयी पुरेशी जनजागृती आणि प्रशिक्षण झाले नसल्याने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

### आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई प्रस्तावित

### दिरंगाई केल्यास कारवाईचा बडगा!

ज्या कार्यांमध्ये समिती स्थापन झाली नाही किंवा अपूर्ण आहे तिथे तात्काळ समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'पॉश' कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर किंवा या आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असा इशाराही रूपाली चाकणकर यांनी दिला आहे. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळावे हा या विशेष ऑडिटचा मुख्य उद्देश असून सर्व यंत्रणांनी याचे काटेकोर पालन करावे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.



### ऑडिटमध्ये या बाबींची होणार तपासणी

● जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणाऱ्या या विशेष ऑडिटमध्ये खालील प्रमुख मुद्द्यांची पडताळणी केली जाणार आहे.
● अंतर्गत समितीचे अधिकृत रचना ( अध्यक्ष, सदस्य, बाह्य सदस्य ) झाली आहे का?
● समिती स्थापनेचा अधिकृत आदेश कार्यालयात उपलब्ध आहे का?
● प्राप्त तक्रारी त्यावरील कार्यवाही आणि प्रलंबित तक्रारींची स्थिती काय आहे?
● दोषींवर करण्यात आलेल्या शिक्षेची अंमलबजावणी झाली आहे का?
● वार्षिक अहवाल सादरीकरण आणि जनजागृती उपक्रम घेतले जातात का?
● कार्यालयातील दर्शनी भागात अंतर्गत तक्रार समितीचा फलक लावलेला आहे का?

# एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखू लागवडीस परवानगी द्या : डॉ. गणेश ढवळे

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी | शेतकरी विरोधी सरकारच्या नावाने ठोकल्या बोंबा

**बीड : प्रतिनिधी**
एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०२ होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील ( प्रांताध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच ) माजी सैनिक अशोक येडे ( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी ), रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक ), कुलदीप करपे( बीड जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना ), सुहास जायभाये ( बीड जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय ), डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक



कार्यकर्ता संघटना बीड ), प्राचार्य डी.जी.तांदळे( बीड अध्यक्ष किसान सभा महाराष्ट्र राज्य ),प्रा.कॉ.विठ्ठलराव सवासे ( किसान सभा म.रा.बीड ), प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ, माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते.

एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारतात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन महाराष्ट्र सर्वप्रथम क्रमांकावर असुन ३८.५ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मराठवाड्यात बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नविन वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. निसर्गाची अवकृपा,,वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला योग्य भाव नसणे, शेतीमालाला निर्यातबंदी आणि कर्जबाजारीपणा या शेतकरी विरोधी धोरणा बरोबरच कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तु कायदा, जमिन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी कायदे रद्द करण्यात यावेत. शेतीमालाला निर्यातबंदी कायमची रद्द करावी. तसेच शेतीमालाला भाव मिळत नसल्याने "एनडीपीएस" कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना सशर्त गांजा,अफु, तंबाखू लागवडीस परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.



खाजगी व्यक्तीच्या हस्तक्षेपाला आयुक्त भास्कर सानप यांचाच सपोर्ट? ➤ मागासवर्गीय संस्था मोडीत काढणारे अधिकारी व खाजगी व्यक्ती यांच्यावर 420 व अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करा!!

# तांदुळवाडीच्या मागासवर्गीय मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्थेला मोडीत काढण्याचा प्रयत्न

➤ सदरील सहकारी संस्थेमध्ये बिगर मागासवर्गीय सदस्यांचा समावेश करून दिली डोळे झाकून मान्यता!!

**धारूर : सुभाष साखरे**
धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथील मागासवर्गीय मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्थेच्या संचालकांना कोणतीही कल्पना किंवा पत्र व्यवहार न करता परस्पर बिगर मागासवर्गीय सभासदाची नियुक्ती करून जुन्या मूळ सभासदांना वगळल्याने याप्रकरणी आयुक्त भास्कर सानप यांचे तर या प्रकरणाला सहकार्य नाही ना? अशी शंका संचालकांना येत आहे. त्यामुळे या संस्थे खोटे व बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी संचालकांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था दुग्ध बीड यांच्याकडे केली आहे.

**मूळ सभासदांऐवजी बिगर मागासवर्गीय सभासदाची नियुक्ती?**
धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथील मागासवर्गीय मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था ही 1986 पासून सर्व नियमानुसार आपले व्यवहार व कार्य करीत आहे. मात्र केज येथील खाजगी व्यक्ती सदरील संस्थेचे बनावट कागदपत्रे तयार करून मूळ मागासवर्गीय सभासदांना पदावर हटवण्यासाठी कार्यालयामध्ये बोगस ठराव व पत्रव्यवहार करत





असतो. मात्र, या बोगस व नकली पत्रव्यवहार याची कोणतीही शहानिशा न करता आयुक्त भास्कर सानप यांनी या मागासवर्गीय मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्थेचे मूळ सभासद यांना त्या ठिकाणी बिगर मागासवर्गीय सभासदाची नियुक्ती करण्यासाठी मंजुरीही देण्यात आल्याची अधिकृत माहिती समजते.

**शहानिशा न करता सदरील बोगस कागदपत्राचे आधारे मूळ सभासद बेदखल!!**
सदरील बनावट व बोगस कागदपत्रे दाखल केल्यानंतर हे कागदपत्रे तपासण्याचा अधिकार संबंधित कार्यालयाला असताना कुठलीही शहानिशा न करता सदरील बोगस कागदपत्राचे आधारे मूळ सभासदांना बेदखल करण्यात आले आहे. व त्या ठिकाणी आपल्या मर्जीतले बगर मागासवर्गीय सभासद नियुक्त केले असल्याची बाब निदर्शनास येत आहे. मात्र, हे प्रकरण आयुक्त भास्कर सानप यांना माहीत असतानाही व संस्थेच्या नियमाप्रमाणे पत्रव्यवहार व मूळ संचालकांचे कुठलेही ठराव किंवा कागदपत्रे नसताना सदरील व्यक्तीच्या प्रस्तावाला मंजूर देऊन या मागासवर्गीय सभासदावर अन्याय केला असल्याचे भावना आता व्यक्त करण्यात येऊ लागली आहे.

### आयुक्त भास्कर सानप हेच सदरील संस्था मोडीत काढण्याचा प्रयत्न करीत आहेत का?

● धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथील ही एकमेव मागासवर्गीय मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्था असून ही सदरील अधिकाऱ्यांच्या डोळ्यात खूपत असावी म्हणूनच आयुक्त सानप यांनी या खाजगी व्यक्तीच्या कागदपत्रांना मंजुरी देऊन ही मत्स्य व्यावसायिक संस्था मोडीत काढण्याचा प्रयत्न केला असल्याची जोरदार चर्चा तालुक्यात होताना ऐकावयास मिळत आहे. म्हणूनच बोगस कागदपत्र तयार करणारे व त्या बोगस कागदपत्राची कुठलीही शहानिशा न करता त्यास मंजुरी देऊन मागासवर्गीय संस्था मोडीत काढणारे अधिकारी व संबंधित खाजगी व्यक्ती यांच्यावर 420 व अॅट्रॉसिटी अॅक्ट नुसार गुन्हा नोंद करावा, अशी मागणी संस्थेचे सचिव विशाल शिरसाट व इतर संचालकांनी केलेली आहे.



# हमीभावाची हमी; हरभऱ्याला योग्य दराची संधी!

## नाफेडअंतर्गत PSS 2025-26 साठी ऑनलाईन नोंदणी सुरु, शेतकऱ्यांनी तत्काळ लाभ घ्यावा

**माजलगाव / प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी उत्पन्नाला योग्य दर मिळावा या उद्देशाने केंद्र शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत (PSS) २०२५-२६ साठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ही खरेदी प्रक्रिया नाफेड तसेच दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन लि. यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

यंदा हरभऱ्याचा शासकीय हमीभाव ५,८७५ रुपये प्रति क्विंटल निश्चित करण्यात आला असून, पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आवश्यक कागदपत्रे : ७/१२ व ८अ उतारा (ई-पिक पाहणी नोंद असणे आवश्यक) आधार कार्ड आधार लिंक असलेले बँक पासबुक (जनधन खाते स्वीकारले जाणार नाही) नोंदणीसाठी शेतकऱ्याने स्वत: उपस्थित राहणे बंधनकारक संपूर्ण खरेदी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून पारदर्शकता आणि सुलभता यावर भर देण्यात येणार आहे. ही नोंदणी व खरेदी प्रक्रिया कानिफनाथ कृषी निविष्ठा सहकारी संस्था मर्या. यांच्या वतीने राबविण्यात येत आहे. नोंदणी व खरेदीचे ठिकाण : दुगड पेट्रोल पंपासमोर, परभणी रोड, माजलगाव, जि. बीड संपर्क : ९८६००६९९७० शेतकऱ्यांनी शेतीमाल योग्य दरात विक्री करून आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# होळी आणि धूलिवंदन : रंगांचा उत्सव की सामाजिक आत्मपरीक्षणाची संधी?



विशेष
प्रवीण बागडे
नागपूर मो.क्र. ९९२३६२०९१९


फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे.

दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना "बुरा न मानो होली है" असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.



महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. "रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला" अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण-आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.

होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, "रंगपंचमीच्या शुभेच्छा" देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.

होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंत:करणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा. सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा!



## मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजानच्या इफ्तारसाठी फळे देऊन चिमुकल्या संविधानचा वाढदिवस साजरा!

**आष्टी : प्रतिनिधी**
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांनी दिलेले भारताय संविधान आणि त्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता, सर्वधर्मसमभाव हे संविधानिक मूल्य प्रत्येक भारतीयांना आपापसात जोडणारे आहे आणि आपण त्याचे पाईक म्हणून सामाजिक जीवन जगत असताना प्रत्येकाने सर्व समाजाबद्दल, समाजातील प्रत्येक व्यक्ती बद्दल व व सर्व धर्माबद्दल विशेष आस्था, प्रेम आणि करुणा ठेवणे गरजे आहे, त्याशिवाय आपण जे काही आहोत, आपल्याला जे काही मिळालेला आहे त्यामध्ये या समाजातील सर्व जातीधर्मीयांचे थोडाफार तरी योगदान असते, या सर्व समाजाचे, समाज बांधवांचे आपण काहीतरी देणे लागतो, आपण त्याची परतफेड थोडेफार सामाजिक काम करून केली पाहिजे, त्याचबरोबर सर्व समाजामध्ये आपापसामध्ये भाईचारा, प्रेम आणि बंधुभाव वृद्धिंगत होण्यासाठी आपणही त्या दृष्टीने काही कार्य केले पाहिजे, या सामाजिक भावनेतून पत्रकार संतोष ससाणे यांचा मुलगा संविधान याचा वाढदिवस त्यांनी या वेळेस मुस्लिम बांधवांचा पवित्र असा रमजान महिना सुरू असल्याने, मुस्लिम बांधवांना रोजा इफ्तारसाठी फळे वाटप करून त्यांनी साजरा केला.

# पिढ्यांमधील होळीचा बदलता चेहरा – परंपरा, माणुसकी आणि आधुनिक दिखावा

## पुरणपोळीपासून व्हॉट्सॲपपर्यंत – बदलती होळी; होळी रे होळी, पुरणाची पोळी



विशेष
सौ. सारिका अरुण बेद्रे
चिंचगव्हान


होळी म्हटली की लहानग्यांच्या चेहऱ्यावर आनंद खुलतो. नवीन नव्हे, तर जुने कपडे घालून रंगांत भिजायचे, पिचकारीने मित्रांना रंगवायचे आणि शेवटी गोड पुरणपोळीवर ताव मारायचा – इतक्यातच सणाची मजा सामावलेली असते. पण या उत्साहामागे एक वेगळीच आठवण दडलेली आहे – ती म्हणजे आजीच्या काळातील होळी.

पूर्वी गावागावांत एकोप्याने सण साजरे होत. एका घरात वीस-पंचवीस माणसं राहत; पण मनं मात्र त्याहून मोठी असत. गाव म्हणजे एकच कुटुंब. पारावर वृद्धांची गप्पा, लेकरांची खेळणी, कुठलेही शुल्क नाही, औपचारिकता नाही. सण आला की सर्वांनी मिळून तयारी. गायीच्या शेणाच्या गौऱ्या लावणे, रंगांची धांदल, आणि होळी झाल्यावर साखरेच्या गाठी खाण्याची उत्सुकता – त्या साधेपणातही वेगळाच आनंद होता.

त्या काळातील होळी ही फक्त लाकडांचे दहन नव्हते; ती मनातील राग-द्वेष जाळण्याची प्रक्रिया होती. एखाद्या घरात दु:ख आले, तर संपूर्ण गाव दु:खी व्हायचे. सणासाठी एकत्र यायची गरज नव्हती; एकत्र येणं हीच सवय होती.

आज मात्र चित्र बदलले आहे. सण साजरा होतो, पण अनेकदा तो





केवळ औपचारिकतेपुरता उरतो. गोड बोलणे खानापुरते, भेटीगाठी ठराविक दिवशीच. माणूस रात्रंदिवस यंत्रासारखा कामात गुंतला आहे. अविस्मरणीय क्षण हातातून निसटत आहेत. सणाचा मूळ उद्देश – नात्यांना उजाळा देणे – तो दुय्यम ठरताना दिसतो.

होळीचा खरा अर्थ म्हणजे अंत:करणातील कटुता जाळणे आणि नात्यांना नव्याने रंग देणे. पैशाच्या चमकदार रंगांपेक्षा माणुसकीची उब महत्त्वाची आहे.

आजही संधी आहे – दिखाव्यापेक्षा आत्मीयतेने होळी साजरी करण्याची. व्हॉट्सॲपच्या शुभेच्छांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष भेटण्याची.

चला, पुन्हा एकदा म्हणूया – होळी रे होळी, पुरणाची पोळी!

मुख्य मुद्दे :
- जुन्या काळातील सामूहिक सणांची परंपरा
- गावोगावी एकोप्याने साजरी होणारी होळी
- राग-द्वेष जाळण्याचा खरा संदेश
- आधुनिक काळातील दिखावूपणा व औपचारिकता
- नात्यांतील दुरावा आणि सणांचा बदलता अर्थ

# भविष्य निर्वाह निधी परताव्यासाठी ऑनलाईन 'बीडीएस' प्रणाली सुरू करा!

## राज्य सरचिटणीस किशन पुंड यांची मागणी



**परभणी : प्रतिनिधी**
राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत संपूर्ण राज्यातील आश्रमशाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीचा (PF) परतावा मिळण्यात अडचणी येत असल्याने ऑनलाईन 'बीडीएस' प्रणाली तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात संघटनेचे राज्य सरचिटणीस तथा कार्यकारी सदस्य किशन पुंड यांनी अतुल सावे, मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय, मुंबई तसेच सचिव, संचालक (पुणे) आणि प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील अनेक अनुदानीत आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी गेल्या काही वर्षांत सेवानिवृत्त झाले आहेत. मात्र 'बीडीएस' ऑनलाईन प्रणाली बंद असल्यामुळे त्यांना भविष्य निर्वाह निधीचा परतावा अथवा ना-परतावा लाभ मिळालेला नाही. परिणामी संबंधित कर्मचारी आर्थिक लाभापासून वंचित राहिले असून त्यांच्यात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ही बाब अत्यंत क्लेशदायक व निंदनीय असल्याचे संघटनेने म्हटले असून, शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन 'बीडीएस' प्रणाली पुन्हा सुरू करून संपूर्ण राज्यातील आश्रमशाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना प्रलंबित लाभ तत्काळ मिळवून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.

## माहूरमध्ये एमपीएल स्पर्धेत 'भाया ११' विजेता; रंगतदार अंतिम सामन्यात 'लाला ११' उपविजेता



**माहूर / प्रतिनिधी :**
येथे आयोजित करण्यात आलेल्या माहूर प्रीमियर लीग (एमपीएल) क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना २६ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. आठ आमंत्रित संघांच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत भाया ११ संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. तर लाला ११ संघाने उपविजेतेपद मिळवले. तृतीय क्रमांकावर तांडा इलेव्हन तर चतुर्थ स्थानावर आरासंग इलेव्हन संघ राहिला.

अंतिम सामना 'भाया ११' आणि 'लाला ११' यांच्यात रंगला. प्रथम फलंदाजी करत भाया ११ संघाने १७० धावांचा भक्कम डोंगर उभा केला. संघाचा कर्णधार कार्तिक यांच्या नेतृत्वाखाली संघाने आक्रमक खेळ केला. निकेश राठोड याने अवघ्या २९ चेंडूत ९२ धावांची तुफानी खेळी करत सामन्याचे चित्र पालटले. सागर अण्णा याने १८ चेंडूत ६२ धावा करत जलद अर्धशतक झळकावले. विजयासाठी मैदानात उतरलेल्या 'लाला ११' संघाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र निर्धारित धावसंख्या गाठण्यात अपयश आल्याने भाया ११ संघ विजेता ठरला. संपूर्ण मालिकेत विठ्ठल याने १९९ धावा करत "बेस्ट बॅट्समन"चा किताब पटकावला. सेमी फायनलमध्ये सुजित याने आक्रमक अर्धशतक झळकावत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तर आकाश सातव याने ६ सामन्यांत ११ बळी घेत "बेस्ट बॉलर"चा मान मिळवला.

विजेत्या संघातील राठोड सर, आदित्य, आकाश राठोड, बाशीद, तन्नू, समाधान जाधव, विकास आदी खेळाडूंनी उत्कृष्ट साथ दिली. संघाचे प्रायोजक सैफ दोसानी यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.







## सैनिक स्कूल परिक्षेत वडवणीचा अथर्व नागरगोजे देशातून १६८ वा तनिष्का बडे व राजवीर घुगे यांचेही सुयश

वडवणी : All India Sainik Schools Entrance Examination (AISSEE) ही प्रतिष्ठेची प्रवेश परीक्षा जानेवारी २०२६ मध्ये पार पडली. या परिक्षेत वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोन्नाखोटा येथील विद्यार्थी चि. अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० पैकी तब्बल २८४ गुण मिळवत देशपातळीवर १६८ वा क्रमांक पटकावला आहे.

याच शाळेतील कु. तनिष्का उद्धव बडे हिने २५९ गुण मिळवले, तर चि. राजवीर बाळासाहेब घुगे याने २६८ गुण मिळवून प्रवेशासाठी पात्रता मिळवली आहे. इयत्ता सहावी प्रवेशासाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा ही अत्यंत स्पर्धात्मक व कठीण स्वरूपाची मानली जाते. प्रश्नपत्रिकेची काठिण्यपातळी उच्च असते तसेच गुणवत्ता यादीत स्थान मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट गुणांची आवश्यकता असते. लेखी परीक्षेनंतर विद्यालय स्तरावर मौखिक परीक्षा घेतली जाते व त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करून प्रवेश निश्चित केला जातो. दरवर्षी या परीक्षेत देशभरातील हजारो विद्यार्थी सहभागी होत असल्याने मोठी स्पर्धा पाहायला मिळते. अशा कठीण स्पर्धेत सोन्नाखोटा शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे तालुक्यासाठी अभिमानास्पद मानले जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनील मुंडे, शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा मुंडे तसेच सोन्नाखोटा शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## बीड जिल्ह्यातील रोजगार सेवकांच्या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा





**आष्टी / प्रतिनिधी :** ग्रामरोजगार सहाय्यक संघटना, बीड यांच्यावतीने जिल्ह्यातील रोजगार सेवकांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने रोजगार सेवक सहभागी झाले होते.

मोर्चाच्या प्रसंगी आष्टी तालुक्याच्या उपस्थित राहून देविदास गर्जे व समीर शेख यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रोजगार सहाय्यक संघटनेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष मनोहर सरोदे, देवीदास गर्जे, संतोष खंडागळे, प्रवीण केरूळकर, लहू शेळके, समीर शेख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आपल्या मनोगतात समीर शेख यांनी रोजगार सेवकांच्या मागण्यांचा पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. तसेच लवकरात लवकर मागण्या मान्य करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.


ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com



सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922







माजलगाव : तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या हिवरा येथील गणेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या वतीने पत्रकार विष्णू उगले व दै.वास्तव चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ यांचा हृदय सत्कार करताना प्राचार्य. सोनवणे बी एस, ज्येष्ठ शिक्षक तथा पंचायत समिती सदस्य मुरलीधर साळवे सर, श्री. बोडखे. डी. टी, श्री सरवदे. एस. यल, श्री काळे के ए, श्री राठोड एम डी, श्री रुचके पि.के, श्री शिंदे जी एम, श्री. लासे के ए, श्री मगरे सुशील, श्री पवार ए.एच, श्री सोनवणे आर.जी, श्री सोनवणे एस के, श्री राठोड पी.डी, श्री राठोड ये.डी आदी शिक्षक बांधव.

## विशेष

# "म" माझ्या मराठीचा



||"म" ||
"म" माझ्या मराठीचा,
कुंभ भावनांचा।
"म" माझ्या मराठीचा,
मातृत्व ममतेचा ||

माझी मराठी बोली,
सरिता समाज प्रवाहाची।
जोडितसे नाती
सदा सर्वदा आपुलेपणाची ||

माझ्या मराठीचे शब्द,
घेतात अंतरीचा ठाव।
माझे मराठी अक्षर,
सांगती शब्दार्थांचा भाव ||

माझी मराठी लिपी,
गाथा मराठी संस्कृती।
सुलेखिली मोर पिसांनी।
ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ||

माझी मराठी मायबोली,
संस्कृती संस्काराची।
अस्मिता स्वाभिमानाची,
तिची प्रशंसा विश्वव्यापी ||

माझ्या मराठी भाषेला,
असे समृध्दीचा वारसा।
तिचा अभिजात दर्जा,
बाणा स्वाभिमानाचा ||

"म" माझ्या मराठीचा,
कुंभ भावनांचा।
"म" माझ्या मराठीचा,
मातृत्व ममतेचा



**रघुनाथ मोहिते**
अंधेरी(प) मुंबई ५३ मो.९८२००८९६९७

## सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी यांचा सत्कार



आष्टी : सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी साहेब यांची सोलापूर जिल्हा गुन्हे शाखा (एल.सी.बी.) येथे नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार अक्षय विधाते, पत्रकार अण्णासाहेब साबळे, पत्रकार संतोष नागरगोजे तसेच शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख उपस्थित होते.

# शिवाजी महाराजांनी स्त्रियांना व उपेक्षितांना सन्मान दिला - पिंजन सरकार

**➤ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पात्रुड येथे रक्तदान शिबिर व व्याख्यान**

**➤ माजलगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हे धार्मिक होते परंतु अंधश्रद्धाळू नव्हते, त्यांनी तत्कालीन परिस्थितीत पुरोगामीत्व अंगीकृत करून अनिष्ट चाली, रुढींना बगल देऊन स्त्रियांना व तत्कालीन परिस्थितीत उपेक्षितांना सर्वसमावेशक पदांवर कामकाजात सहभागी करून घेतले व त्यांच्यावर जबाबदारी दिलेल्या त्यांना न्याय दिला असे प्रतिपादन पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते राकेश पिंजन सरकार यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील पात्रुड येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रक्तदान शिबिर व प्रबोधनात्मक व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सरपंच एकनाथ मस्के हे तर तर प्रमुख पाहुणे म्हणून जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन चव्हाण पाटील, घनश्याम भुतडा, डॉ.वसीम मनसबदार, चेअरमन संतोष घुबडे, अनिकेत गायके, व्याख्याते बिडवे, डॉ. प्रकाश शिंदे, डॉ. अशोक घुबडे, विलास मोरे, माऊली नाटकर, नवनाथ चाळक, बाळासाहेब बनकर, धनंजय काळे उपस्थित होते. पुढे बोलताना पिंजण सरकार म्हणाले की, छत्रपती



शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांसाठी विशेष धोरण राबविले त्यांना अर्थसाह्य करून, शेतीला लागणारे अवजारे, बी बियाण्यांची उपलब्ध करून दिले. सार्वजनिक शिवजयंती उत्सवासाठी अक्षय मोरे, ऋषिकेश नाटकर, विशाल जाधव, तुषार गायकवाड, सोमेश्वर राऊत, श्री. घाडगे, शुभम राऊत, भिमराव काटे, अनिकेत चाळक यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक समर्थ नखाते यांनी केले तर सूत्रसंचालन भागवत भुजबळ यांनी तर आभार पत्रकार प्रकाश यादव यांनी मानले.

# मोबाईलवरून महिलेशी अश्लील संभाषण; वकिलावर विनयभंगाचा गुन्हा

**➤ पीडितेच्या तक्रारीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**➤ माजलगाव : प्रतिनिधी**

शहरातील एका वकिलाने मोबाईलवरून महिलेशी अश्लील व लज्जास्पद संभाषण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाणे येथे संबंधित वकिलाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, ॲड. सुधीर लिंबगावकर यांनी आपल्या मोबाईलवरून पीडित महिलेला फोन करून संभाषणास सुरुवात केली. "वेळ आहे का तुला?" अशी विचारणा केल्यानंतर महिलेने कामाबाबत विचारणा केली असता आरोपीने कथितपणे अश्लील व लज्जास्पद भाषेचा वापर केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेनंतर पीडित महिलेने तात्काळ पोलिस ठाणे गाठून आपली तक्रार नोंदवली. पोलिसांनी प्राथमिक चौकशी करून संबंधित वकिलाविरुद्ध भारतीय दंड संहितेनुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**मुद्दे :** ● शहरातील एका वकिलाविरुद्ध महिलेशी अश्लील संभाषण केल्याचा आरोप ● मोबाईलवरून फोन करून लज्जास्पद भाषा वापरल्याची तक्रार ● पीडितेने तातडीने पोलिस ठाण्यात धाव घेतली ● आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल

# गुणवत्तेत अग्रेसर राहून विद्यार्थींनी शाळेचा नावलौकिक करावा - मुख्याध्यापक शिवदास शेकडे

आष्टी / प्रतिनिधी :

स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल आणि आई, वडिलासह गावासोबत शाळेचे नाव मोठे करायचे असेल तर गुणवत्तेत अग्रेसर राहून विद्यार्थीनी शाळेचा नावलौकिक करावा. असे प्रतिपादन भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवदास शेकडे यांनी केले.

ते भैरवनाथ विद्यालयातून एनएमएमएस( NMMS ) परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या रेणुका मोहन शेकडे, आयान शौकत पठाण या दोन विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्या प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पत्रकार नितीन कांबळे शौकत पठाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, ग्रामीण भागातील शाळा असताना देखील शिक्षकांच्या अभ्यासपूर्ण अध्यापनातून मुलांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली झाली



आहे. या कठीण परिक्षेत देखील विद्यार्था चमकू लागले आहेत. भविष्यात विद्यार्थी जिल्हा नव्हे राज्य पातळीवर जाऊन शाळेचे नाव मोठ करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी भैरवनाथ विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मधुकर तांदळे, मुख्याध्यापक शिवदास शेकडे, सहशिक्षक अशोक तांदळे, बाळासाहेब राजगुरू, किसन शेकडे, कृष्णा शेकडे, प्रवीण तांदळे, दत्ता शिरसाठ, नारायण आंधळे, विश्वनाथ शेकडे, ग्रामपंचायत सदस्य आसमा शौकत पठाण याच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच अरणविहरा, तागडखेल, जोमदार तांड्यासह परिसरातील ग्रामस्थांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# श्री क्षेत्र मढी येथे मानाच्या होळीसाठी गोपाळ समाजाला उत्साही आवाहन – रामराजे गव्हाणे

**वडवणी / अशोक फपाळ**

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व भटक्यांची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कानिफनाथ गड येथे दिनांक २ मार्च (सोमवार) रोजी मानाची होळी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. सुमारे ४५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या यात्रोत्सवात राज्यभरातील नाथभक्त व समस्त गोपाळ समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवा नेते रामराजे गव्हाणे यांनी केले आहे.



गोपाळ समाजाचे आराध्य दैवत चैतन्य कानिफनाथ महाराज यांच्या जयघोषात गावाची पारंपरिक होळी प्रज्वलित केली जाते. गडाच्या उभारणीत गोपाळ समाजाच्या पूर्वजांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे पंचकमिटीने हजारो वर्षांपूर्वी गोपाळ समाजाला मानाच्या व शेणाच्या पाच गौऱ्या पेटवण्याचा मान दिला असल्याचे सांगितले जाते. पाथर्डी न्यायालयाच्या आदेशानुसार लोणारे, माळी, कालापाड, नवघरे, हबरे व गिऱ्हे या सहा आडनावांच्या समाज बांधवांना होळीचे मानकरी म्हणून सन्मान दिला जातो. समाजाच्या अस्मितेचे प्रतीक असलेली ही मानाची होळी पेटवताना हजारो भाविक उपस्थित राहतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजाची एकजूट व परंपरा जपण्यासाठी सर्व गोपाळ समाज बांधवांनी आपला अमूल्य वेळ देऊन मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे. "समाजाची एकजूट आणि परंपरेचा अभिमान जपत आपण सर्वांनी मानाच्या होळीत सहभागी व्हावे," असेही रामराजे गव्हाणे यांनी नमूद केले.

# आखाती देशांतील महाराष्ट्रातील नागरिकांसाठी राज्य शासनाच्या

● पान ४ वरून ...... वेळोवेळी देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

परदेशात अडकलेल्या नागरिकांबाबत माहिती देण्यासाठी अथवा आपत्कालीन मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र (SEOC) २४×७ कार्यरत राहणार आहे. नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १०७७, मोबाईल +९१-९३२१५८७१४३, दूरध्वनी ०२२-२२०२७९९० किंवा controlroom@gov.in व कुवैत फोन : +९६५-६५५०१९४६ (२४×७ आपत्कालीन), ई-मेल : community.kuwait@mea.gov.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

देशनिहाय आपत्कालीन संपर्क क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत. कतार (दोहा), संयुक्त अरब अमिरात (अबूधाबी/दुबई) आणि सौदी अरेबिया (रियाध/जेद्दाह) येथील भारतीय दूतावासांचे हेल्पलाईन क्रमांक व ई-मेल आयडी नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | म्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# माजलगाव शहरात अवैध विदेशी दारू वाहतुकीविरुद्ध पोलिसांची कारवाई

## पोलीसांचा छापा; २.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त



➤ **अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**

माजलगाव शहरात अवैध विदेशी दारू वाहतुकीविरुद्ध पोलिसांनी दोन स्वतंत्र कारवाया करून एकूण २ लाख ३६ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार जुने बसस्थानक परिसरात छापा टाकण्यात आला. यावेळी हरीभाऊ सखाराम नाटकर (वय ३५, रा. वारोळा ता. माजलगाव जि. बीड) हा त्याच्या ताब्यातील एमएच-४४ वाय-८१९७ या दुचाकीवर विविध कंपन्यांची विदेशी दारू वाहतूक करताना आढळून आला. त्याच्याकडून सुमारे ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ६१/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ) (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, शहरातील जेथलिया कॉर्नर परिसरात दुसऱ्या कारवाईत मनोज मारोती गायकवाड (वय २८, रा. तेलगाव ता. धारूर जि. बीड) याला त्याच्या ताब्यातील पांढऱ्या रंगाच्या एमएच-१२ एफएफ-४८३६ क्रमांकाच्या मारुती अल्टो ८०० कारमधून विदेशी दारू वाहतूक करताना पकडण्यात आले. त्याच्याकडून १ लाख ७३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ६२/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनिरीक्षक संदीप राठोड व पथकातील कर्मचाऱ्यांनी केली. पुढील तपास सुरू आहे.

### मुख्य मुद्दे

● गुप्त माहितीच्या आधारे दोन ठिकाणी छापे ● एकूण २,३६,४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त ● दोन आरोपींवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल ● वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई



राहुल सूर्यतळ,
पोलीस निरीक्षक शहर

---

## विशेष




## गांधी महाविद्यालयात जागतिक मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

आष्टी / प्रतिनिधी :

गांधी महाविद्यालय कडा येथे जागतिक मराठी भाषा दिन उत्साहात साजरा, यानिमित्ताने महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ ज मो भंडारी यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यांनी मार्गदर्शन करताना असे सांगितले की, मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे दरवर्षी कुसुमाग्रज उर्फ तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिन साजरा केला जातो कुसुमाग्रजाने मराठी भाषेला जागतिक पातळीवर पोहोचवले त्यांचे साहित्य मराठीचा सार्थ अभिमान आहे, 'विशाखा' काव्यसंग्रहाला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे, त्यांची, 'कणा' व 'गर्जा जयजयकार क्रांतीचा,' या कविता तरुणांच्या प्रेरणास्थान आहेत, असे विचार त्यांनी मांडले,, मराठी विभाग प्रमुख, प्रोफेसर डॉ अनिल गर्जे यांनी प्रास्ताविकामध्ये मराठी भाषा आपल्या भावविश्वाला आकार देते. विचारांना दिशा देते. मराठीचा गौरव म्हणजे आपल्या परंपरेचा आणि प्रगत विचारांचा गौरव होय. या दिनी आपण मराठीचा सन्मान राखण्याचा आणि तिच्या संवर्धनासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प करूया त्यांनी असे मत व्यक्त केले, सूत्रसंचालन प्रोफेसर डॉ तुकाराम गोंदकर यांनी केले, कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ अशोक कोरडे यांनी मानले, यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित मध्ये प्रोफेसर डॉ अशोक कोरडे पा, प्रोफेसर डॉ श्रीकांत मगर, प्रोफेसर डॉ किशोर कोईनकर, प्रोफेसरडॉ किशोर चौधरी, प्रोफेसर डॉ तुकाराम गोंदकर, प्रोफेसर डॉ इनुस सय्यद, प्रा दादा धलपे, प्रा सचिन ढगे, डॉ प्रशांत मेहेर, प्रा दत्तात्रय हारकर, प्रोफेसर डॉक्टर राजकुमार थोरवे, प्रोफेसर डॉ नरेंद्र गवळी, प्रोफेसर डॉ विष्णुपंत गव्हाणे, प्रोफेसर डॉ आशिष कटारिया, श्री वाल्मीक तरटे, श्री रंगनाथ शिंदे, प्रोफेसर डॉ सुदाम जाधव, प्रोफेसर डॉ शिवाजी जगदाळे, यावेळी प्राध्यापक कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरद तोष्णीवाल अबॅकस स्पर्धेत देशात आठवा

### पुणे येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनीय यश



माजलगाव / प्रतिनिधी :

पुणे येथे दि. २७ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत किल्ले धारूर येथील आरूष प्रोॲक्टिव्ह अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले. वरद शिवप्रसाद तोष्णीवाल याने देशपातळीवरील या स्पर्धेत आठवा क्रमांक मिळवत संस्थेचे व शहराचे नाव उज्ज्वल केले.

या स्पर्धेत देशभरातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कठोर सराव आणि मार्गदर्शनाच्या जोरावर वरदने नेत्रदीपक कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले.

या यशाबद्दल आरूष प्रोॲक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे संचालक प्रा. अविनाश जगताप व संचालिका शीतल जगताप यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच पालक आणि धारूर येथील शिक्षणप्रेमी नागरिकांनीही वरदच्या यशाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मुख्य मुद्दे :
- दि. २७ फेब्रुवारी रोजी पुणे येथे राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा
- किल्ले धारूर येथील आरूष प्रोॲक्टिव्ह अबॅकस क्लासेसचा सहभाग
- वरद शिवप्रसाद तोष्णीवाल देशात आठव्या क्रमांकावर
- संचालक प्रा. अविनाश जगताप व संचालिका शीतल जगताप यांचा गौरव
- पालक व शिक्षणप्रेमींकडून अभिनंदन

## महायज्ञ सोहळ्याची जय्यत तयारी सुरु महायज्ञ मंडपाचे काम पूर्णत्वास -ह.भ.प.केशव महाराज शास्त्री

### महायज्ञ सोहळा व ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांची रामकथा व कीर्तन महोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी



केज/प्रतिनिधी

श्रीकृष्ण मंदिर बांधकाम भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने महायज्ञ सोहळा व ह. भ. प. रामराव महाराज ढोक यांच्या राम कथेचे आयोजन ह. भ. प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीकृष्ण आश्रम यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे गेल्या एक महिन्यापासून महायज्ञ मंडपाचे काम चालू असून राजस्थान येथून गवत व लाकडी बांबूच्या साह्याने महाकाय यज्ञ मंडपाचे काम आज पूर्णत्वास आले आहे. तसेच राम कथेचा मंडप व भोजन मंडपाचे काम प्रगतीपथावर चालू आहे या कार्यक्रमासाठी केज तालुक्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त हे या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यामुळे येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी भोजन व्यवस्था, राहण्याची व्यवस्था ही या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक महायज्ञ सोहळ्यानिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून केज येथील श्रीकृष्ण आश्रम या ठिकाणी येणार आहेत असा कार्यक्रम आपणास न भुतो न भविष्यती पहावयास मिळणार आहे तरी सर्व भावीक भक्तांनी या महायज्ञ सोहळ्याचा लाभ घ्यावा व ह. भ. प. रामराव महाराज ढोक यांच्या संगीत राम कथेचा आस्वाद घ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण आश्रमांचे संस्थापक ह. भ. प. केशव महाराज शास्त्री यांनी केले आहे.

## ५ वर्ष सतत गैरहजर असलेले ग्राम सेवक अचानक गावात अवतरल्याने गावकरी गेले भारावून

### फटाके फोडून ढोल ताशाच्या गजरात केले अनोख्या पद्धतीने स्वागत

➤ **पैठण / प्रतिनिधी :**

कौंदर कुतुबखेडा ग्रुप ग्राम पंचायतचे ग्राम सेवक तब्बल पाच वर्षाच्या दीर्घकाळाने निवडणूक प्रभाग रचनेच्या कामानिमित्तदि(२६) गुरुवार रोजी अचानक कार्यालयात आवतरल्याने येथील नागरिकांना चक्क आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. मग त्या आश्चर्यचकित झालेल्या ग्रामस्थांनी अत्यंत भारावलेल्या अवस्थेत फटाके फोडत ढोल ताशांच्या गजरात या ग्रामसेवक साहेबांचे शाल श्रीफळ अन् हार घालून अनोख्या पध्दतीने स्वागत केले. या अनोख्या स्वागताची त्या गावातच नाहीतर अवघ्या तालुक्यात ज्याच्या त्याच्या तोंडी खमंग चर्चा होतांना दिसत आहे.

याविषयी माहिती अशी की, कौंदर कुतुबखेडा या ग्रुप ग्राम ग्राम पंचायतीमधे सात सदस्य आहे. या गावचे ग्रामसेवक म्हणून राजीव दिलवाले यांची मागील चार ते पाच वर्षांपूर्वी नेमणूक करण्यात आलेली आहे. या गावच्या ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार या ग्रामसेवक महोदयांनी मागील पाच वर्षात एकदाही गावात हजेरी लावली नाही. या गावांचा सर्व कारभार ते एकतर हाॅटेलमधे बसून किंवा आपल्या घरून हाकत होते. जर कोणाला काही प्रमाणपत्र किंवा काही शासकीय कागदपत्राची अत्यंत आवश्यकता भासली तर वरील ठिकाणावरून घ्यावी लागत. त्यांच्या मुळे गावातील कित्येक गोरगरीब नागरिकांचे अनेक वर्षापासून महत्त्वाची कामे रेंगाळलेली आहे. त्यातच हे ग्रामसेवक महोदय ग्राम पंचायत निवडणूक प्रभाग रचनेच्या कामानिमित्तदि(२६) गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात आले होते. आपले ग्रामसेवक तब्बल पाच वर्षाने आपल्या गावात आल्याची माहिती गावातील ग्रामस्थांना मिळाली असता आपले ग्रामसेवक कोण आहे हे बघण्यासाठी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयाकडे धाव घेतली. दीर्घकाळाने गावात अवतरलेल्या साहेबांना पाहून अनेकांची माथी फिरकली तर काहींना अत्यंत आश्चर्याचा सुखद धक्का बसल्याने त्यांनी आपल्या ग्रामसेवक साहेबांचे फटाके फोडून ढोल ताशा वाजवत त्यांना शाल श्रीफळ व हारतूरे घालून जंगी स्वागत केले. कौंदर कुतुबखेडा गावच्या ग्रामस्थांनी अचानक अशा अनोख्या लाजिरवाण्या पद्धतीने केलेल्या स्वागताला लाजून या ग्रामसेवक साहेबांनी गावातून काही वेळातच कोणाला काही न सांगता काढता पाय घेतला असल्याची चर्चा अख्या तालुक्यात होत आहे.



> कुतुबखेडा ग्रामपंचायतचे ग्रामसेवकहे गावात कधीच आले नाही. ते आपल्या मनाप्रमाणे गावचा कारभार चालवतात. त्यांच्या या आडमुठे धोरणामुळे जन्म-मृत्यू नोंदणी, विविध प्रमाणपत्रे, शासकीय योजनांच्या अर्जांवर त्यांची सही घेण्यासाठी त्यांचा जागोजागी शोध घ्यावा लागतो. तसेच पीक कर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांना विविध दाखल्यांची गरज असते परंतु ग्रामसेवक हे सतत गैरहजर राहतात असल्याने समस्त गावकरी पुरतेवैतागून गेलेले आहेत.
> **अशोक नजन,** ग्रामस्थ कुतुबखेडा

## आखाती देशांतील महाराष्ट्रातील नागरिकांसाठी राज्य शासनाच्या अत्यावश्यक सूचना

इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मध्य-पूर्व व आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा विचार करून परदेशात वास्तव्यास असलेल्या तसेच अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने अत्यावश्यक सूचना जारी केल्या आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसेच संबंधित देशांतील भारतीय दूतावासांनी २४×७ आपत्कालीन हेल्पलाईन सुरू केल्या असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांकडून ● पान ३ वर ...

**अवैध वाळू वाहतूक उघड; सहा लाखांचा ट्रक जप्त**

## पाथरी-परभणी मार्गावर अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध महसूल विभागाची कारवाई

### पाथरी-परभणी रोडवर महसूल पथकाची धडक कारवाई; संबंधितांवर पुढील कार्यवाही सुरू

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

पाथरी-परभणी मार्गावर अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध महसूल विभागाने कारवाई करत सुमारे सहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एमएच-०६ ए क्यू ९६४९ क्रमांकाचा ट्रक ताब्यात घेण्यात आला.

महसूल पथकाने नियमित तपासणीदरम्यान संबंधित ट्रकची पाहणी केली असता आवश्यक परवानगी व कागदपत्रे नसल्याचे आढळले. त्यानंतर ट्रकसह वाळू जप्त करण्यात आली. प्राथमिक अंदाजानुसार जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे सहा लाख रुपये आहे.

ही कारवाई तहसीलदार संतोष रुईकर सह मंडळ अधिकारी आप्पासाहेब साणप, महसूल सहायक गणेश खेत्री, जाकीर शेख, महेश आव्हाड आणि दादासाहेब ढगे यांनी केली. पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




**मुख्य मुद्दे :** ● पाथरी-परभणी रोडवर तपासणीदरम्यान कारवाई ● एमएच-०६ ए क्यू ९६४९ क्रमांकाचा ट्रक जप्त ● सुमारे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत ● तहसीलदार संतोष रुईकर स्वत : पथकात कारवाई करताना

## बॉन सु क्रो प्रकल्प च्या ऊसतोड महिलांसाठी आरोग्य शिबिर

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्यावतीने एन एस एल शुगर युनिट नंबर तीन येथील ऊसतोड मजूर महिलांसाठी शिबिर संपन्न झाले यावेळी प्राध्यापक डॉक्टर श्रीकांत येळेगावकर मार्गदर्शक फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, प्राध्यापक डॉक्टर एन बी तेली चेअर पर्सन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, मूर्ती साहेब एन एस एल शुगर पवारवाडी येथील एमडी, देवबाप्पा जोगरे एच आर मॅनेजर यासीन सरकावस जूनियर एच आर मॅनेजर पारसमल साहेब जनरल मॅनेजर के न विभाग, दत्तात्रेय आहेरकर साहेब ए जी एम, यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅम्प आयोजित करण्यात आला होता शुक्लेश्वर लिमगाव फाटा, तालुक्यातील ढोरगाव येथे ऊसतोड मजूर महिलांसाठी कार्यक्रम घेण्यात आला यावेळी सुगत रत्न गायकवाड शाखा अधिकारी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर प्रमुख मार्गदर्शक होते तर आकाश गायकवाड फील्ड कॉर्नेटर शाहीर मेंढक एल डब्ल्यू एस उपस्थित होते यावेळी एन एस एल शुगर चे बी एल फपाळ साहेब केन विभाग उपस्थित होते ते टेकाळे साहेब, तिडके साहेब यांची टीम कार्यक्रमाला उपस्थित होते व कार्यक्रम घडवून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता डॉक्टर गरुड मॅडम, डॉक्टर मोरे मॅडम, डॉक्टर काशीद मॅडम यांनी १५० ऊसतोड महिला व मजूर मल तपासणी केली

यावेळी आरोग्य कर्मचारी काळेसाहेब, राठोड साहेब, कमले सिस्टर, भागीत्रा केंदळे यांनी सहकार्य केले लॅब टेक्निशियन मुंडे यांनी रक्ताच्या चाचण्या केल्या संस्थेचे लिंक वर कर पाटील साहेब घुगे मॅडम यांनी सहकार्य केले शेख शहाबुद्दीन यांनी सर्वांचे आभार मानले.



**स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी** ➤ चाकूचा धाक दाखवून हातातील सोन्याची पिशवी हिसकावून घेऊन पळून गेले होते

# रोडवर आडवून डोळ्यात चटणी टाकून सोनारास लुटणारी दरोडेखोरांची टोळी अखेर जेरबंद

➤ **केज/प्रतिनिधी :**

रोडवर आडवून डोळ्यात चटणी टाकून सोनारास लुटणारी दरोडेखोरांची टोळी अखेर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने दमदार कामगिरी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गु. र. नं. ४६/२०२६ कलम ३०९(६) बी. एन. एस. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर फिर्यादी हे सोनार असून ते सोने विक्री करण्यासाठी जुन्या डिघोळआंबा येथे एका मोटरसायकलवरून बसून जात असताना केज तालुक्यातील होळ ते डिघोळआंबा येथील दर्ग्याजवळ अज्ञात दोन मोटार सायकलवर चार जणांनी येऊन फिर्यादी सोनारांची मोटरसायकल आडवून त्यांच्या डोळ्यात तिखट चटणी टाकून व त्यांना चाकूचा धाक दाखवून मारहाण करून हातातील सोन्याची पिशवी जबरदस्तीने हिसकावून घेऊन पळून गेले होते. व्यापारी सोनार यांच्या फिर्यादीवरून युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गु. र. नं. ४६/२०२७ कलम ३०९(६) बी. एन. एस. नुसार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अज्ञात आरोपीचा शोध हा युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शोध घेत होते परंतु आरोपीचा ठावठिकाणा लागत नव्हता.



वरील नमूद गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना एकूण जवळपास ५० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले होते. सदर सीसीटीव्ही फुटेज मधील संशयित इसमांची माहिती घेणे सुरू असताना दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमी मिळाली की, सदर सीसीटीव्ही फुटेज मधील संशयित इसम नामे रोहित रणजीत धिमधीमे हा असून तो आंबेजोगाई बसस्थानक लगत राज मेडिकल जवळ उभा असल्याची माहिती मिळाल्यावर त्यास पथकाने ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा हा सुदाम गणपत सोनवणे रा. डिघोळअंबा ता. धारूर व पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार वीरसिंग रीसपालसिंग टाक रा. आंबेजोगाई यांच्या सांगण्यावरून त्यांचे इतर साथीदार नामे अभिषेक अशोक घाटूळ रा. कन्हेरवाडी ता. परळी, कानिफनाथ विलास डुरकर रा. क्रांतीनगर आंबेजोगाई, यशोदीप कल्याण किर्तन रा. सातेफळ ता. आंबेजोगाई यांच्यासह मिळून केला असल्याचे सांगितले.

सदर गुन्ह्यात एकूण सहा आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहेत. सदर प्रकरणातील आरोपी पकडण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

तसेच आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटरसायकली त्यांची अंदाजे किंमत १ लाख ५० हजार रुपये, ६ मोबाईल ज्याची अंदाजे किंमत ९० हजार रुपये यासह सोनाराचे जबरदस्तीने चोरून नेहलेले सोन्याचे दागिने ज्याची अंदाजे किंमत ३ लाख रुपये असे एकूण ५ लाख ४० हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील सहा आरोपी व जप्त केलेला मुद्देमाल हा पुढील तपास कामी पोलीस ठाणे युसुफ वडगाव यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गीते, मारुती कांबळे, दीपक खांडेकर, गणेश मराडे, विकी सुरवसे यांनी केली आहे.